Df
१०/७/२४
5:00

# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १०/०७/२०२४

## प्रेसनोट

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका द्वारे आयोजित "सुब्रतो फुटबॉल" स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अझीझ शेख, व अतिरिक्त आयुक्त, मा. जमिर लेंगरेकर, साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार, सेंच्युरी रेयॉन हायस्कुल, रामलीला मैदान येथे दिनांक ०८/०७/२०२४ ते १०/०७/२०२४ पर्यत वयोगट १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले/मुलींच्याकरीता जिल्हा स्तरीय ६३ वी"सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप"या क्रीडा स्पर्ध्येचे आयोजन करण्यात आलेले होते. सुब्रतो फुटबॉल स्पर्ध्येतएकुण७ शाळाच्या १५ टिम सहभागी झाल्या होत्या"सुब्रतो फुटबॉल" स्पर्ध्येत१५ वर्ष वयोगटातील गुरूनानक शाळेच्या मुलांनी प्रथम क्रमांक पटकावला तर न्यु इंग्लिश हायस्कुलचा दुसरा क्रमांक व सेंच्युरी हायस्कुलच्या मुलांनी तिसरा क्रमांकाचे पारितोषिक मिळविले, १७ वर्ष वयोगटातील मुलीच्या संघातगुरूनानक हायस्कुल, यांचा प्रथम क्रमांक, तर न्यु ईरा हायस्कुलचा, दुसरा क्रमांक, व ब्लूमिंगबड हायस्कुलचा तिसरा क्रमांक, १७ वर्षे वयोगाटातील मुलांच्या गटातगुरूनानक हायस्कुल, प्रथम क्रमांकाने विजय मिळविला, तर ब्लूमिंगबड हायस्कुलचा मुलांनी दुसरा क्रमांक प्राप्त केला व तिस-या क्रमांकाचे पारितोषिक हे एस. ई. एस. खेमाणी हायस्कुल,मुलांनी मिळविले.

सदर कार्यक्रमास मा. डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त(क्रीडा), श्री. शांताराम चौधरी, क्रिडा अधिकारी, श्री. राजेश घनघाव, दिव्यांग विभाग प्रमुख, श्री. अंकुश कदम, भंडार विभाग प्रमुख, रोटरी क्लब ऑफ उल्हासनगरचे चेअरमन श्री. जीतु चैनानी, माजी चेअरमन ॲडव्होकेट मनिष वाधवा, श्री. प्रकाश चंगलानी, श्री. अशोक चंचलानी, शाळेचे शिक्षक श्री. प्रमोद परसी, सुभाष कोंबारी, राजगुरू सर, प्रफुल सर,श्री. उदय पवार,श्री. प्रशांत कुंभारडे, श्री. निखिल सिंगोलीया, श्रीम. उर्मिला भेरे. व वैद्यकिय अधिकारी डॉ. ऋतुजा महालुंगे या मान्यवरांच्या उपस्थितीत खेळ घेण्यात आला.

१०/७/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत – माहितीस्तव.**
**मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका**

**प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.**

1. **पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका**
2. **सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका**
   **- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.**